
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. १५५६५



शिवशाही

# छत्रपतींच्या छावणीत

डॉ. तु. वा. सावंत



IRBK-0115565

बा. वा. १५५६५
२५।१।७८

नाटयरूप शिवशाही

नाटिका ५ वी

संपादक : डॉ. म. वि. गोखले


एम.ए., पीएच्.डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[क्र. मा. प.]

बा. वा. १५५६५
२५।१।७८



नाटयरूप शिवशाही

नाटिका ५ वी

संपादक : डॉ. म. वि. गोखले

एम.ए., पीएच्.डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दा. क्र. १५५५८
वि. ब. वा. क्र. ..................

# छत्रपतींच्या छावणीत

( स्त्रीपात्र विरहित ऐतिहासिक नाटिका )

लेखक

## डॉ. तु. ता. सावंत

एम्.ए., एम.एड्., पीएच्.डी

प्रकाशन क्रमांक १५२

किमत १ रुपया

या नाटिकेचा प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची आगाऊ परवानगी घ्यावी.

पत्ता :– डॉ. तु. ता. सावंत, डी. १४–म्युनिसिपल स्टाफ कॉलनी, गिल्डर लेन, मुंबई–८

प्रकाशिका : सौ. निर्मला नारायण अरगडे, सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन १६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

© सर्व हक्क प्रकाशिकांच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून १९७४

मुद्रक : सौ. वसुधा रघुनाथ खरे, अक्षर मुद्रणालय, ४७ इंडस्ट्रियल इस्टेट, नागरगाव, लोणावळा (जि. पुणे)

नाट्यवेड्या बालमित्रांनो,

हा जून १९७४ ! म्हणजे ठीक ३०० वर्षापूर्वी (जून १६७४ मध्ये) महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला चेतना देणारी एक महान घटना घडली ! श्रीशिवाजीराजे यांनी हिंदवी राज्याची मुहूर्तमेढ रोवून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. हिंदवी स्वराज्याचा हा छत्रपती म्हणजे गुणसागरच होता !

जाणिवेच्या रवीला रसिकतेचा दोर लावून या श्रीशिवचरित्ररूपी गुण-सागराचे मंथन केले तर नानाविध गुणांचे नवनीत घुसळून वर येते. साहस, शक्ती, युक्ती, न्यायप्रियता, शिस्तप्रियता, दूरदर्शीपणा, नीतिमानता, संस्कार-क्षमता–किती किती म्हणून त्यांचे गुण सांगावे !

अशा या लोकोत्तर पुरुषश्रेष्ठाच्या चरित्रातील निवडक प्रसंगाचे नाट्य-रूप दर्शन घडवून, त्यांच्या विविध गुणांचा परिचय आमच्या बालमित्रांना करून द्यावा, यासाठी ही 'नाट्यरूप शिवशाही' निर्माण केली आहे. रंजना-बरोबरच ध्येयसिद्धी असा हा योग आहे. तुम्हांला तो आवडेलच आवडेल !

१९/२७७, लोकमान्यनगर
पुणे ३०
जून १९७४

सूत्रधार– नाट्यरूप शिवशाही

IRBK-0115565

# छत्रपतींच्या छावणीत

## —: पात्र परिचय :—

शिवाजी महाराज

नेताजी पालकर

इनायतखानाचा वकील

ॲबिसीनियाचा वकील

दोन हिंदू व्यापारी

फादर ॲम्ब्रास

इनायतखानाने पाठविलेला मारेकरी

मिस्टर स्मिथ

महाराजांचा शरीरसंरक्षक

मावळे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५२५८६ नों. दि. २५।१२।८
वि. ....आ.ना.......................

# छत्रपतींच्या छावणीत

(स्थळ :–सुरत शहराबाहेरील बऱ्हाणपूर दरवाजाबाहेरील बाग. एका झाडाला बांधलेल्या पालाखाली छत्रपती शिवाजीमहाराज उभे आहेत. त्यांच्या मागे त्यांचा शरीरसंरक्षक मावळा हातात नंगी तलवार घेऊन उभा आहे. लुटीचा मोल्यवान माल पडलेला आहे.)

वेळ :–दुपारनंतरची

(कर्णे शिंगाचे आवाज दूरवरून ऐकू येतात. मागोमाग घोड्यांच्या टापा ऐकू येतात.)

**नेताजी** : (घाईघाईने प्रवेश करतो) महाराजांचा विजय असो !

**महाराज** : नेताजी, काय खबर ?

**नेताजी** : महाराज, सावकारांच्या घरांच्या खणत्या अजून चालू आहेत. बहुतेकांचे खजिने हस्तगत केले. अपरिमित द्रव्य मिळाले पण—

**महाराज** : पण काय, नेताजी ? मराठ्यांना विरोध करायला कुणाची माय व्याली आहे ?

**नेताजी** : तसा विरोध करायची कुणातच हिंमत नाही. पण लुच्चे व्यापारी दौलत घेऊन पळू लागले आहेत.

**महाराज** : पळपुट्यांचा पाठलाग करा. त्यांना बेमुलाहिजा खस्त करा. त्यांची संपत्ती हिसकावून घ्या. आज स्वराज्य उभारायला उदंड द्रव्याची गरज आहे.

**नेताजी** : महाराज, वेळ फारच कमी आहे. जलदी करायला पाहिजे. त्यासाठी–

**महाराज** : कशाची गरज आहे ? वाटेल ते करा. सुरतेतला सारा पैका इथं

आलाच पाहिजे. राजगड त्याची वाट पाहातोय ! जलदी करा. वेळ गमावू नका.

**नेताजी** : त्यासाठी महाराजांना विनंती करायची आहे.

**महाराज** : कशासाठी ?

**नेताजी** : महाराजांनी हुकूम द्यावा.

**महाराज** : हुकूम ? कशासाठी ?

**नेताजी** : पळपुट्यांची कत्तल करण्यासाठी ! शहर बेचिराख करण्यासाठी !

**महाराज** : नेताजी ?

**नेताजी** : महाराज, याशिवाय दुसरा उपाय नाही.

**महाराज** : कारण ?

**नेताजी** : मराठी लष्कर संकटात आहे. मिळविलेली लूट असुरक्षित आहे. महाराजांचे जीवित धोक्यात आहे.

**महाराज** : तुमचे म्हणण्याचा मतलब ?

**नेताजी** : महाराज, मोगल फौज सुरतेच्या कोटात ठाण मांडून बसली आहे. इंग्रज आणि वलंदेज आपापल्या वखारीत पाय रोवून उभे आहेत. ते तोफांना बत्ती देण्याच्या पावित्र्यात आहेत. आणि–

**महाराज** : आणि काय ?

**नेताजी** : हेरांनी भयंकर खबर आणली आहे.

**महाराज** : कोणतीही खबर शूराला भयंकर नसते !

**नेताजी** : महाराज, ही बातमी फारच भयंकर आहे. (थांबून) मोगल सेनापती महाबतखान संतापला आहे.

**महाराज** : तो आपल्या पारिपत्यासाठी निघाला आहे, असंच ना ?

**नेताजी** : होय, महाराज ! महाबतखान सुरतेच्या रोखानं दौडत आहे. थोड्या घटकात त्याची प्रचंड फौज सुरतेच्या वेशीवर येऊन ठेपेल. आपले परतीचे मार्ग रोखले जातील. बाहेरून महाबतखान आणि आतून इनायतखान, अंग्रेज

आणि वलंदेज यांच्या कैचीत मराठी फौज सापडेल. महाराज, वेळ बिकट आहे. हुकूम द्यावा. सर्रास कत्तल करण्याचा हुकूम द्यावा.

**महाराज** : कत्तल ? कुणाची ? कशासाठी ?

**नेताजी** : गनिमाच्या रयतेची कत्तल. माजलेल्या गनिमाच्या गुर्मी उतरवण्यासाठी. आपला धोका टाळण्यासाठी. स्वराज्य राखण्यासाठी. महाराज, हुकूम द्यावा.

**महाराज** : पूर्वी असंच घडलं आहे. इतिहासाच्या पानापानातून मानवी रक्ताच्या तांबड्या नद्या खळाळून वाहिल्या आहेत. चेंगीज़खान, तैमूरलंग यांच्यासारखे नरराक्षस इतिहासानं पाहिले आहेत. त्यांनी रयतेचा प्रचड संहार केला. मुडद्यांच्या कवटयांचे पर्वत उभारले. तें मोठेच शूर वीर होऊन गेले— नाही ?

**नेताजी** : महाराज, प्रत्येक क्षण मोलाचा आहे. भयंकर संकट तुफान वेगानं दौडत येत आहे.

**महाराज** : या संकटाची चाहूल आम्हालाही लागली आहे. पण आम्ही मजबूर होणार नाही. आमची खातिरजमा झाली आहे. आमचा मराठा डावा डौल दाखवणार नाही. तो संकटाची खबर घेईल.

**नेताजी** : महाराज, कसं सांगू ? मनातली चिंता कशी दाखवू ? हजारो मराठ्यांची व्यथा कोणत्या शब्दात आपल्यासमोर बोलू ? आम्ही हजारो मराठे आपल्यासाठी आमच्या पंचप्राणांची आहुती द्यायला तयार आहोत. आमची एकच प्रार्थना आहे. महाराजांची पावलं राजगडावर सुरक्षित पोचायला हवीत. महाराज, आमच्या हृदयात काहूर उठलं आहे. सांगा, गनिमाची कुबल फौज सुरतेचं दार ठोठावू लागली तर आम्ही काय करावं ते सांगा.

**महाराज** : त्यावेळी मुलाहिजा बाळगू नका. हरएकानं हुन्नर दाखवा. गनीम गर्दीला मिळवा. पण नेताजी, जिवाच्या भयानं पळणाऱ्या रयतेची कत्तल करणं ही आपली परंपरा नव्हे. याची हमेशा याद राखा.

**नेताजी** : महाराज, महाबतखानाच्या दौडीनं धरती हादरू लागली आहे. आता उपाय कोणता ?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५५८९ नों. दि २५।१२।८
वि. ... क्र. ...

**महाराज** : नेताजी, सर्वच ठिकाणी घोडा फेकता येत नाही. कधी कधी ढाल फेकून पळून जाणं योग्य असतं.

**नेताजी** : थोड्या घटकांनी पळायलाही वाट रहाणार नाही. शिवाय–

**महाराज** : शिवाय काय?

**नेताजी** : महाबतखान इथं येऊन पोचला की हीच गरीब रयत बळावेल. आपला सूड घ्यायला धावून येईल.

**महाराज** : नेताजी, रयतेची कत्तल केलियानं अधर्म होईल.

**नेताजी** : महाराज, धर्माधर्माचा विचार करण्याची ही वेळ नव्हे !

**महाराज** : अशा वेळी विचार करीत नाहीत त्यांचेकडूनच अविचार घडतो.

**नेताजी** : क्षणामागं क्षण दौडतो आहे. महाबतखानाची फौज सुरतेकडे धावते आहे. थोड्या घटकांनी मराठ्यांच्या नाशाची घटका भरेल. महाराज, कत्तल करायला हुकूम द्यावा!

**महाराज** : नेताजी, ते कदापि होणं नाही. हा तो क्षत्रियाचा धर्म नव्हे. हा नामर्दपणा ! आमचे मावळे शूर आहेत. आमचे सेनापती खंबीर आहेत. कचदिल असेल तो मराठाच नव्हे. महाबतखान येऊ द्या. त्याची प्रचंड फौज येऊ द्या. प्रत्यक्ष आलमगीर येऊ द्या. आमची हिंमत आहे आम्हाला साथ द्यायला. तलवारीला तलवारीनं जबाब देऊ. भाल्याला भाला भिडवू. कारण तुर्कीचा जबाब तुर्कीतच दिला पाहिजे !

(तोफांचा गडगडाट होतो.)

**महाराज** : नेताजी, हा गलबला कसला?

**नेताजी** : इनायतखानानं तोफा डागल्या आहेत. महाराज, हेच सांगायला आलो होतो. प्रचंड तोफा आग ओकीत आहेत. सुदैवानं तोफांचे गोळे आपल्या फौजेच्या डोईवरून गेले. मराठी फौज वाचली. पण शहर पेटलं आहे. आगीचा डोंब उसळला आहे. घरं धडाधड कोसळत आहेत. अस्मान धुरानं धुंद झालं आहे. दारुगोळ्याचा वास पिऊन वारा बेलगाम उधळला आहे.

**महाराज** : (विचार करून) नेताजी, गैरहुशार राहू नका. गनीम दगाफटका करील.

**नेताजी** : महाराज, आम्ही पूर्ण सावध आहोत. मोगल अंमलदार इनायतखान सुरतेच्या आतील कोटात जाऊन बसला आहे. धोका आहे तो पळपुट्या सावकारांचा आणि महाबतखानाच्या फौजेचा.

**महाराज** : मराठ्यांनी कुणावरही अत्याचार करता कामा नये. स्त्रिया, मुलं वृद्ध, गरीब, फकीर, मशिदी, दर्गे, अग्यारी यांना उपद्रव लागता कामा नये. आमचे कानी कागाळी आल्यास नतीजा बरा होणार नाही.

**नेताजी** : महाराजांच्या हुकमाचं पालन होत आहे. सामान्य रयत पहिलेच दिवशी शहर सोडून गेली आहे. खासे धनिक इनायतखानाबरोबर किल्ल्यात दडून बसले आहेत. शहर ओस पडलं आहे. ज्यांना इनायतखानाकडे आसरा मिळाला नाही ते सावकार पळताहेत. आम्ही त्यांच्या पाठी पाहात बसलो आहोत.

**महाराज** : नेताजी, राजगडापासून दीडशे कोसांवर आपण आहोत. भोवताली मोगली प्रदेशाचा जबरदस्त विळखा पडला आहे. आपल्या या साहसाची गनिमाला कल्पनाही करवली नसेल. सुरत लुटण्याची योजना एक वर्षापूर्वीच आम्ही आखली होती. यशाची खातरजमा होती. निबीड अरण्यातून रात्रीचा प्रवास करायचा होता. ठायी ठायी मोगलांची कुबल ठाणी होती, त्यांना टाळायचं होतं. हलक्या पावलांनी सुरत गाठायची होती. शेवटी आम्ही सुरत पाहिली. आम्ही सुरत लुटली. आम्ही औरंगजेबाची दाढी मुळापासून खेचून काढली. नेताजी, आज आम्ही खूष आहोत. आमच्या लष्करावर आम्ही निहायत खूप आहोत. भवानीमातेनं स्वप्नात दाखवलं. तसंच सारं घडलं !

**नेताजी** : पण महाराज !

**महाराज** : अद्यापी पण काय ?

**नेताजी** : अंग्रेज आणि वलंदेज यांनी बाका वख्त निर्माण केला आहे. अंग्रेजांनी मग्रुरी चालवली आहे.

**महाराज** : सुरत ही अंग्रेजांची मिरास आहे ? आमच्या देशात येऊन परक्यांची आमच्याशी मग्रुरी ?

**नेताजी :** होय, महाराज! अंग्रेजानी आपण येण्यापूर्वी मोठ्या डौलात परेड काढली होती. भरलेल्या बंदुका खांद्यावर टाकून ते मार्गामार्गातून मिरवत गेले होते. आजही अंग्रेज वखारीबाहेर आले होते.

**महाराज :** आमचे लोक काय करीत बसले होते?

**नेताजी :** मराठी लष्कर खवळलं होतं. उसळलं होतं. उफाळलं होतं. पण—

**महाराज :** परकीयांना उपद्रव करू नका, असा आमचा आदेश होता, असंच ना?

**नेताजी :** महाराजांनी बरोबर ओळखलं. अंग्रेजांच्या उर्मटपणानं प्रत्येक मराठा पेटला होता. कारण वखारीत पाऊल टाकाल तर याद राखा. तंगड्या तोडल्या जातील, अशी अंग्रेजांनी धमकी दिली होती. त्यांची ही खुमखुमी जिरवलीच पाहिजे. त्यांना गर्दीला मिळवलंच पाहिजे.

**महाराज :** किती लोक असतील अंग्रेजाकडे?

**नेताजी :** लोकांची संचणी सुमार आहे. करीब दोनशे लोक असतील! त्यांची चटणी उडवायला वेळ नको. फक्त आज्ञा द्यावी.

**महाराज :** नेताजी, आपण सुरतेवर चालोन आलो ते कशासाठी? इंग्रजांची चटणी करण्यासाठी खास नाही. आपण आलो पादशहाचं नाक ठेचायला. आपण त्याला शास्त केली. आता आपल्याला राजगडावर परतायला हवं!

**नेताजी :** (निराशेने) जशी महाराजांची आज्ञा!

(मावळा प्रवेश करतो.)

**मावळा :** (मुजरा करून) इनायतखानाकडून हेजीब आला आहे.

**महाराज :** ठीक. त्याला आमचे समोर रुजू करा.

(मुसलमानी वेषात इनायतखानचा हेजीब येतो. तो मोठा मग्रूर दिसतो.)

**महाराज :** (हेजिबाला) कुणी पाठवलं तुम्हाला?

**वकील :** इनायतखाँसाबने!

**महाराज :** आमची मुलाजमत जातीनं घ्या, असं आम्ही कळवलं होतं. आमची मेहेमानी जातीनं करण्याऐवजी त्यांनी तुम्हाला पाठवलं? ठीक! काय

मसलत आहे तुमच्या खानसाहेबांची ?

**वकील** : जो हुआ वो अच्छा नही हुआ।

**महाराज** : मतलब ?

**वकील** : मरहट्टे तीन दिन सूरत लूट रहें हैं। यह अच्छा नही हुआ।

**महाराज** : मराठ्यांना तुम्ही काय पुंड समजता ? लुटारू आहात तुम्ही ! तुमच्या पादशहाच्या वाडवडिलांनी गेली तीनशे वर्षे आमच्या देशाची भयानक लूट चालविली आहे. तुम्ही आमची संपत्ती लुटलीत, बायकांची अब्रू लुटलीत! या देशाची सत्ता लुटलीत. क्या यह अच्छा हुआ ?

**वकील** : हमारे लोग मारे गये, यह अच्छा नही हुआ।

**महाराज** : तुमच्या बापजाद्यांनी आमच्या लाखो लोकांची आजवर कत्तल चालवली आहे–त्याचं काय ?

**वकील** : मरहट्टोने हमारे मकान जलाये यह अच्छा नही हुआ।

**महाराज** : गेली तीनशे वर्षे तुम्ही आमचा मुलूख जाळलात, आमचे राजवाडे पेटवलेत, आमची मंदिरं भस्मसात केली–हे काय चांगलं झालं ?

**वकील** : मरहट्टोने जो कुछ किया वह अच्छा नही हुआ ?

**महाराज** : म्हणजे चुरूचुरू बोलणारी तुमची ही असंस्कृत जीभ अजूनही आम्ही छाटली नाही, यह अच्छा नही हुआ ?

**वकील** : यह अच्छा नही हुआ कि मरहट्टोने सूरतकी इज्जत लूट ली।

**महाराज** : लुटायला सुरतेला इज्जत तरी होती का ? तुझा इनायतखान पातशहाकडून पाच हजार–हशमांचा पगार घेतो आणि केवळ एक हजार फौज बाळगतो. चार हजार सैनिकांचा पगार स्वतःच्या खिशात गायब करतो. केवढी ही सुरतेची इज्जत ? बरं ते जाऊ दे. आमच्या निरोपाचा जबाब इनायतखानानं पाठवला आहे की नाही ?

**वकील** : भेजा है।

**महाराज** : ठीक ! इनायतखानाला भेजा आहे तर ! सुरतेत दाखल होण्यापूर्वीच आम्ही संदेश पाठविला होता. आमचा संदेश असा होता–– उदयीक

आम्ही सुरतेत दाखल होणार आहोत. समक्ष जातीनं भेटा. दंड ठरवा. रक्कम भरण्याची तजवीज करा. असं न केल्यास आम्हास लूट व जाळपोळ करावी लागेल. आणि त्याची जबाबदारी तुमचेवर राहील. बोला, आमच्या या निरोपाला काय जवाब आहे तुमचा ?

**वकील** : शहेनशहाको यह मालूम होगा तब वे नाराज होंगे। नतीजा खतरनाक होगा ।

**महाराज** : यह बात है ? आम्ही तुझ्या शहेनशहाचा गुमान धरतो की काय? नेताजी, या उर्मटाच्या मुसक्या बांधा. त्याला कैदखाना दाखवा. मराठ्यांचा खाना कसा असतो ते त्याला कळू द्या.

(दोन शिपाई वकिलाला भाल्याच्या टोकांनी ढुसण्या देत घेऊन जातात.)

**महाराज** : नेताजी, मोगलाईच्या पापाचे घडे आता पूर्ण भरले. इनायतखानासारखे अंमलदार बदअंमल करू लागले. बेइमानी अंमलदार राज्य राखू शकत नाहीत. आज अंमलदार लाचखाऊ झाले आहेत. आता हे राज्य बुडालेच समजा ! अंमलदारांनी रयतेला लेकरासारखं पाळायला हवं. पण इनायतखान रयतेला वाऱ्यावर सोडून किल्ल्यात दडून बसला आहे. धिक्कार असो !

(मावळे दोन हिंदू व्यापाऱ्यांना पकडून आणतात.)

**पहिला व्यापारी, दुसरा व्यापारी** : महाराज, आम्हाला वाचवा. आम्हाला वाचवा. आमच्यावर दया करा.

(व्यापारी महाराजांच्या पायावर लोटांगण घालतात.)

**महाराज** : कोण तुम्ही ?

**प. व्यापारी** : आम्ही व्यापारी आहोत. पिढ्यान् पिढ्या या सुरत शहरात आम्ही व्यापारउदीम करीत आलो आहोत.

**महाराज** : कसला व्यापार केलात ? इमानाचा की अकलेचा ?

**मावळा** : महाराज, हे दोघे आम्हाला फसवून जात होते.

**दु. व्यापारी** : महाराज, लक्ष्मीची शपथ— आम्ही फसवीत नव्हतो. जीव

वाचविण्यासाठी आम्ही पळत होतो.

**महाराज** : गेली तीनशे वर्षं तुमचे बापजादे असेच पळत होते. तुम्ही तरी वेगळं काय करणार ?

**प. व्यापारी** : मावळ्यांनी आमचा बेसुमार पाठलाग केला.

**महाराज** : मग ? तुमची अपेक्षा काय होती ? मावळ्यांनी तुम्हाला पंचारती ओवाळावी की काय ?

**दु. व्यापारी** : महाराज, आम्ही मावळ्यांच्या हाती लागलो नसतो. पण नदी आडवी आली.

**प. व्यापारी** : नदी कसली, महाराज ? आमचं दुर्दैवचं आडवं आलं.

**दु. व्यापारी** : मराठ्यांनी आम्हाला नदीवर अडवलं. अडवलं तर अडवलं पण त्यांनी आम्हाला जाम पकडलं. पकडलं तर पकडलं पण आम्हाला महाराजांसमोर आणलं. बरं, आणलं तर आणलं पण महाराज, आम्हाला आता सोडायचा हुकूम द्या.

**मावळा** : महाराज, हे दोघं दोन पिपं सोनं घेऊन पळत होते.

**महाराज** : दोन पिपं सोनं?

**प. व्यापारी** : महाराज, आमची दौलत ! आमच्या कैक पिढ्यांची दौलत !

**दु. व्यापारी** : महाराज, आमची दौलत! आमची दौलत!

**महाराज** : एवढी दौलत मिळवायला कोणत्या लढाईत तलवार मारलीत ? कोणत्या शेतात हे सोनं पिकवलंत ? कोणत्या समुद्रात ही रत्नं पागलीत?

**दु. व्यापारी** : महाराज, शेतात आणि समुद्रात कसं सोनं मिळणार ? आम्ही व्यापारी आहोत. अगदी गरीब व्यापारी आहोत.

**महाराज** : फारच गरीब दिसता! दोन पिपं सोनंही तुम्हाला कमीच वाटेल, नाही ?

**प. व्यापारी** : महाराज, गरिबावर दया करा.

**दु. व्यापारी** : आमचं सोनं द्या.

**महाराज** : विचार करा. काय हवं तुम्हाला? सोनं की जिणं?

प. व्यापारी : महाराज कर्णासारखे उदार आहेत.

दु. व्यापारी : महाराजांचा जयजयकार असो!

प. व्यापारी : महाराज प्रचंड प्रतापी आहेत!

दु. व्यापारी : महाराज महापराक्रमी आहेत!

प. व्यापारी : महाराज, आमचं सोनं द्या.

दु. व्यापारी : महाराज, आमचं सोनं द्या.

महाराज : नेताजी, या हांजीखोरांना दूर करा. आसुडाचे पन्नास पन्नास फटके द्या.

प. व्यापारी : महाराज, चालतील, फटकेही चालतील!

दु.व्यापारी : महाराज, जलदी करा, लवकर फटके द्या!

प. व्यापारी : आणि ताबडतोब सोनंही द्या.

महाराज : नेताजी, हें द्रव्यलोभी पागल झाले आहेत. यांची डोकी उडवा.

प. व्यापारी : महाराज, दया करा. आम्ही हिंदू आहोत.

महाराज : आज तुम्हाला हिंदुधर्म याद झाला!

दु. व्यापारी : खरोखरच आम्ही हिंदू आहोत हो!

प. व्यापारी : होय महाराज! कपाळावरचा हा चंदनाचा टिळा पहा.

दु. व्यापारी : हे यज्ञोपवीत पहा.

दु. व्यापारी : महाराज, ही शेंडीही पहा.

महाराज : खरोखरच तुम्ही हिंदू आहात?

प. व्यापारी : यज्ञोपवीताची शपथ घेऊन सांगतो–मी हिंदू आहे.

दु. व्यापारी : आलमगिराची आण घेऊन सांगतो–मी हिंदू आहे.

महाराज : ठीक! सांगा, राणा प्रतापसिंह कोण होता ?

प. व्यापारी : अहाहा! महाराणा प्रतापसिंह ! महान पराक्रमी पुरुष होऊन गेला!

महाराज : प्रतापच्या राज्यातला भामशाहा तुम्हाला ठाऊक आहे?

**बु. व्यापारी :** वा ! वा ! भामशाहा केवढा धनवान ! तो तर फारच थोर पुरुष!

**महाराज :** राणा प्रताप वनवासी झाला तेव्हा भामशाहानं आपली सगळी संपत्ती त्याला देऊन टाकली. कशासाठी? मोगलांच्याविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध चालू ठेवण्यासाठी! ... आणि तुम्ही? ... आम्हाला स्वराज्य उभारण्यासाठी एवढंसं सोनंही देऊ नये!

**प. व्यापारी :** महाराज, भामशाह कोठे आणि आम्ही कोठे ? कुठं हिमालय नी कुठं सुरतेची टेकडी ?

**बु. व्यापारी :** खरंच महाराज ! आम्ही भामशहाएवढे थोर नाही.

**प. व्यापारी :** हो! आम्ही आपले गरीब व्यापारी !

**महाराज :** एकूण काय ? तुमच्यासारख्या धनिकांना जात नसते. देश नसतो. धर्म नसतो. द्रव्य हीच तुमची जात. द्रव्य हाच तुमचा देश. द्रव्य हाच तुमचा धर्म ! धिक्कार असो तुम्हाला. जा, चालते व्हा. काळं करा एकदाचं !

(मावळे व्यापाऱ्यांना ओढीत नेतात. दुसऱ्या बाजूने एक मावळा ॲबिसीनियन वकिलाला घेऊन येतो. हमालांच्या डोक्यावर सोन्याचे सिंहासन आहे. सिंहासन उतरून ठेवल्यावर सगळे महाराजांना मुजरा करतात.)

**मावळा :** महाराज, हे ॲबिसीनिया देशाचे हेजीब.

**ॲबि. वकील :** (मान हलवून) हं ! हं ! हं ! !

**मावळा :** हे सोन्याचं सिंहासन औरंगजेबाला नजर करण्यासाठी त्यांनी आणलं होतं.

**महाराज :** (स्वगत) भावांच्या रक्तात बरबटलेले पादशहाचे हात कुणालाच दिसत नाही. जगाला सत्तेपुढं न्याय-अन्याय दिसत नाही. हा पातशहा आमच्यावर अमानुष जुलूम करतो आहे. पण ते या वकिलाला दिसू नये ? पण त्याला तरी दोष कसा द्यावा. ज्यांच्यावर जुलूम होतो आहे त्या रजपुतांना तरी पादशाहाचा जुलूम कुठं दिसतो आहे ? जुलूम सोसणारी माणसंच मानवजातीचे शत्रू आहेत.

**मावळा :** हे वकील सुरतेत एका धर्मशाळेत उतरले होते.

**महाराज** : इथंच ते चुकले !

**अँबि. वकील** : हं ! हं ! हं ! !

**मावळा** : इनायतखानानं लाच देणाऱ्या धनिकांना किल्ल्यात आसरा दिला. हे वकील आसरा मागायला किल्ल्याच्या तटापर्यंत गेले होते. पण लाच द्यायला यांच्यापाशी द्रव्य नव्हतं. हे माघारी फिरले. आम्हाला भेटले. हा नजराणा महाराजांना अर्पण करावा, अशी त्यांची इच्छा आहे.

**महाराज** : त्यांना म्हणावं–पुन्हा कधी याल तेव्हा वाट चुकू नका. थेट राजगडावर या. जा, त्यांना बंदरावर सुरक्षित रवाना करा.

(मुजरा करून वकील मावळ्याच्या मागोमाग जातो. दुसऱ्या बाजूने फादर अॅम्ब्रास येतो. तो महाराजांना मुजरा करतो.)

**महाराज** : हें कोण ? फादर अॅम्ब्रास ? तुम्हाला कोणी गिरफदार केलं ?

**फादर अॅम्ब्रास** : नाय ! महाराज, मला कोनीबी पकडला नाय. मी सोता आला !

**महाराज** : का बरं ?

**फादर अॅम्ब्रास** : आपले उपकार स्मरायला. तुमचे मावल्या लोकांनी आमचे मठाला हात लावला नाय. पाय बी लावला नाय. तुम्ही हिंदू लोग लई चांगला हाय.

**महाराज** : फादर अॅम्ब्रास, आम्ही सगळे धर्म पवित्र मानतो. परमेश्वर एक आहे. कुल माणसं त्याची लेकरं आहेत. जगात मोठा धर्म एकच माणुसकी ! जा, तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही. जा, बेशक जा !

(फादर अॅम्ब्रास मुजरा करून जातो.)

**महाराज** : नेताजी, आता राजगडावर निघायलाच हवं. आम्हालाही खबर लागली आहे महाबतखान सुरतेवर चालोन येत आहे आमचं पारिपत्य करण्यासाठी. येऊ द्या त्याला सावकाश. जा, लष्कराला वर्दी द्या.

(नेताजी मुजरा करून जातो. पडद्यात शिंग वाजते. दुसऱ्या बाजूने एक मावळा येतो.)

**मावळा :** (मुजरा करून) इनायतखानाचा हेजीब आला आहे.

**महाराज :** इनायतखानाचा दुसरा हेजीब! ठीक त्याचीही भेट अलबत्ता घेऊ. रुजू करा त्याला.

(वकील येतो)

**वकील :** मैं सलूख करने आया हूँ।

**महाराज :** इनायतखानानं पाठवलं ?

**वकील :** जी हाँ।

**महाराज :** पण आता काय उपयोग ? व्हायचं ते होऊन चुकलं. (थांबून) ठीक! खानसाहेबांचा काय संदेश आहे ?

**वकील :** मै सलाह करने आया हूँ !

**महाराज :** बोला, काय सलाह आहे तुमचा ?

**वकील :** मरहट्टे हमे चार दिनसे लूट रहे हैं। हम हैरान हो चुके है।

**महाराज :** छान! आम्ही फक्त चार दिवस सुरतेत राहिलो तर तुम्ही हैरान झालात! अं! पण तुमचा शायिस्ताखान चार वर्षं पुण्यात तळ देऊन बसला होता. खुद्द आमच्या वाड्यात लालमहालात. त्यानं आम्हाला देशोधडीला लावलं. आमचा मुलूख उजाड केला. तेव्हा नाही सलूख करायला आलात ?

**वकील :** (बेपर्वाने) जो कुछ भी हुआ हो ! तुरन्त शहरसे निकल जाओ। वरना--

**महाराज :** ही घमेंड ! तुझा सरदार बायकांसारखा किल्ल्यात लपून बसला आहे. त्याच्या अटी पाळायला तू काय आम्हाला बायका समजतोस ?

**वकील :** घुस्सा नही करना। (थांबून) आपसे मुझे कुछ कहना है।

(वकील महाराजांच्या जवळ सरकतो. कट्यारीने महाराजांवर वार करतो. इतक्यात शरीरसंरक्षक मावळा त्याच्या हातावर तलवारीचा वार करतो. पण वकील महाराजांच्या अंगावर कोसळतो. मावळे धावून येतात. महाराज उठून उभे राहातात. मावळे मारेकऱ्याला जेरबंद करतात. महाराज क्रोधाने

पेटले आहेत.)

**मावळे** : कत्तल ! कत्तल ! कत्तल ! !

**महाराज** : दगाबाज ! याची गर्दन मारा !

(दोन मावळे मारेकऱ्याला घेऊन जातात.)

**मावळे** : महाराज, कुल कैद्यांची कत्तल करायला हुकूम द्यावा. सूड ! सूड ! सूड ! ! आम्ही सूड घेणार ! आम्ही बदला घेणार !

(ते जाताना सूड ! सूड ! बदला ! बदला ! अशा घोषणा करतात. महाराज विचारात उभे आहेत. एक मावळा स्मिथला पकडून आणतो.)

**मावळा** (मुजरा करून) महाराज, हा मिस्टर स्मिथ !

**महाराज** : हा पुन्हा सापडला ?

**मावळा** : महाराजांनी याला एकदा दया दाखवली होती.

**महाराज** : तीन दिवसांपूर्वी याला आम्ही सोडलं होतं. अंग्रेजांकडून तीन लाख रुपये दंड वसूल करण्याची याला आज्ञा केली होती. आणला का दंड यानं ?

**मावळा** : नाही, महाराज !

**महाराज** : अंग्रेजांनी आमच्या कामात व्यत्यय आणला होता. त्यांनी दंड भरलाच पाहिजे.

**मावळा** : महाराज, अंग्रेज दंड भरायला तयार नाहीत.

**महाराज** : कोण म्हणतो, अंग्रेज दंड द्यायला कबूल नाहीत ?

**मावळा** : हाच मिस्टर स्मिथ ! यानं अंग्रेजांचा निरोप आणला आहे.

**महाराज** : निरोप ? काय म्हणून ?

**मावळा** : अंग्रेज म्हणतात–आम्ही व्यापारी लोक आपल्याजवळ पैका ठेवीत नाही. चालत असेल तर काही कापड व मसाल्याचा नजराणा पाठवू. वेंगुर्ल्याच्या वखारीला तुम्ही उपद्रव न देता अद्यापपर्यंत स्नेहानं वागवलं आहे. तसंच येथेही चालवावं. तुमच्या माहितीशिवाय कोणी आम्हाला त्रास देऊ पाहील तर त्याच्याविरुद्ध बंदोबस्तासाठी आम्ही हुशारीत आहोत.

**महाराज** : एवढी हिंमत ! आम्ही मग्रुरी मानत नाही. स्मिथनं दंड आणला

नसेल तर त्याला मृत्युदंड मिळेल.

**मावळा :** महाराजांनी आज्ञा द्यावी.

**महाराज :** पण मृत्युदंडाची सजा याला कमीच होईल. मग्रुराला मोठाच दंड हवा.

**मावळा :** महाराजांनी हुकूम द्यावा.

**महाराज :** ठीक ! याला जन्माची याद राहील अशी सजा मिळेल. (थांबून) त्याचा उजवा हात तोडा.

**मावळा :** जशी महाराजांची आज्ञा !

(मावळा स्मिथला पकडून जायला निघतो. स्मिथ घोटाळतो. तो महाराजांकडे वळतो. हॅट काढतो व मुजरा करतो.)

**स्मिथ :** महाराज ! उजवा हात तोडला मंग आमी कसाला जगायचा ? आमी महाराजना प्रार्थना करते. आमचा डोसका तोडा.

**महाराज :** शाबास ! तुला जीवन समजलं आहे, मिस्टर स्मिथ ! माणसान जगावं जगण्यासारखं जवळ काही आहे तोवर. कुजत जगणं म्हणजे जीवन नव्हे. (थांबून) ठीक. द्या त्याला सोडून.

(मावळा स्मिथला सोडून देतो.)

**स्मिथ :** आमी उपकार मानते. महाराजांचा मन मोटा हाय.

(स्मिथ मुजरा करून जातो. एक मावळा हातात नागवी. रक्तलांछित तलवार धरून येतो.)

**महाराज :** कैद्यांना शासन दिलं ?

**मावळा :** होय, महाराज ! चार कैद्यांची गर्दन मारली. चोवीस कैद्यांचे हात तोडले. अजून पुष्कळ कैदी आहेत. आता झपाझप उडवतो त्याना.

(मावळा जायला निघतो.)

**महाराज :** थांब ! (थांबून) कैद्यांना मुक्त करा. सगळ्यांना— ताबडतोब.

**मावळा :** जशी महाराजांची आज्ञा !

(मावळा जातो व नेताजी येतो.)

**नेताजी** : महाराजांचा विजय असो !

**महाराज** : नेताजी, काय नवीन खबर ?

**नेताजी** : महाराज, खबर आनंदाची आहे.

**महाराज** : बोला, सरनोबत !

**नेताजी** : अपरिमित लूट लाभणार आहे.

**महाराज** : कोण आहे हा धनिक ? बहिर्जींच्या यादीतून हा कसा सुटला ?

**नेताजी** : हा धनिक सुरतेचाच रहिवासी आहे. तो वलंदेजांचा दलाल होता. मोठा भव्य वाडा आहे त्याचा. वाड्यात मुबलक मालमत्ता आहे.

**महाराज** : कुठेसा वाडा आहे त्याचा ?

**नेताजी** : इथून अगदी नजीक.

**महाराज** : आणि तो तुम्ही अजून लुटला नाही ?

**नेताजी** : कसूर माफ असावी, महाराज ! आम्ही तो कधींच लुटला असता. नव्हे आताही तो लुटण्यासाठीच गेलो होतो. पण–

**महाराज** : तुम्ही माघार घेतलीत ? तुम्हाला विरोध झाला ?

**नेताजी** : होय, महाराज !

**महाराज** : कुणी विरोध केला ?

**नेताजी** : मावळ्यांनी ! महाराजांच्या मावळ्यांनी !

**महाराज** : काय सांगता, नेताजी ?

**नेताजी** : महाराज, मी खरं तेच बोलतो आहे.

**महाराज** : नेताजी, तुम्ही आमचे सरनोबत आणि तुम्हाला आमच्या मावळ्यांनी विरोध केला म्हणता ? चमत्कार आहे !

**नेताजी** : होय, खरं आहे. वाडा लुटणं अगदी सोपं काम आहे. कारण वाड्यात एक विधवा स्त्री आणि तिची मुलं आहेत. संपत्तीचं रक्षण करायलाही कुणी नाही. पण–

**महाराज** : पण काय ?

**नेताजी :** चार मावळे वाड्याचं रक्षण करीत उभे आहेत.

**महाराज :** नेताजी ! कुणाबद्दल बोलता आहात ?

**नेताजी :** मोहनदास परेखबद्दल–

**महाराज :** मोहनदास परेख ! आलं लक्षात. मोहनदास परेखचा वाडा लुटायचा नाही. अशी आम्हीच आज्ञा देऊन ठेवली आहे. आम्हीच– मावळ्यांचा पहारा बसवला आहे. आमची सक्त ताकीद आहे–मोहनदासचा वाडा जो लुटील त्याला कडक शासन होईल. (थांबून) नेताजी, तुम्हाला चमत्कार वाटला ? ऐका–मोहनदास परेख आज जिवंत नाही. तो वलंदेजांचा दलाल होता. त्यानं अलोट संपत्ती मिळवली. पण मोहनदास परेख धर्मात्मा होता. गोर-गरिबांचा कैवारी होता. मोठा उदार होता. त्यानं उदंड दानधर्म केला होता. माणुसकीला जपणारा तो एक लाख माणूस होता. माणुसकीच्या रक्षणासाठी आम्ही झगडतो आहोत आणि आमरण आम्ही झगडत राहणार. आम्ही माणुसकी लुटू शकत नाही. तो अधर्म होईल. (थांबून) नेताजी, निघायची तयारी करा. महावतखानाला झुकांडी देऊन आपल्याला राजगड जवळ करायला हवा. ताबडतोब तयारीला लागा.

**नेताजी :** जशी महाराजांची आज्ञा !

(इतक्यात एक मावळा येतो.)

**मावळा :** एक तरुण बाई आली आहे. ती महाराजांची भेट मागत आहे.

**महाराज :** उभं शहर पेटलं आहे. सैनिकांना विजयाचा उन्माद चढला आहे. तरुण पुरुष पळून जाताहेत. आणि अशा वेळी ही तरुण स्त्री आली कशी ? कोण आहे ती ?

**मावळा :** महाराज, मी खूप चौकशी केली. पण ती म्हणते–मी महाराजांना सगळं सांगेन. ती गुजराती आहे.

**नेताजी :** महाराज, काहीतरी दगलबाजी दिसते. महाराजांनी तिची भेट घेऊ नये.

**महाराज :** ठीक. तुम्ही तिची जातीनं चौकशी करा.

(नेताजी व मावळा जातात.)

**महाराज :** (शरीरसंरक्षकास) गणोजी, आपल्याला आता निघायला हवं. शिंगाड्याला शिंग वाजवायला सांगा.

(गणोजी जातो. शिंग वाजू लागतें. महाराज विचारात येरझारा घालतात. गणोजी येतो. काही क्षणात नेताजी परत येतो.)

**नेताजी :** महाराज, ती तरुण स्त्री थांबली आहे !

**महाराज :** कोण आहे ती ?

**नेताजी :** मोहनदास परखेची थोरली मुलगी.

**महाराज** : मोहनदास परेखच्या कुटूंबाला आम्ही संरक्षण दिलं आहे. मग ही येण्याचं कारण काय ? तिची कुणी आगळीक केली की काय ?

**नेताजी :** महाराज, कुणीही आगळीक केलेली नाही. तिच्या आईनं तिला पाठवलं आहे. आपल्या भेटीसाठी !

**महाराज** : कारण ?

**नेताजी** : कसूर माफ असावी. महाराज ! मी नुकताच मोहनदास परेखच्या वाड्यावर गेलो होतो. पहाऱ्यावर असलेल्या मावळ्यांशी माझं बोलणं झालं ते या मुलीच्या आईनं ऐकलं. तिला वाटलं, तिचा वाडा लुटण्याचा मराठ्यांचा इरादा आहे. म्हणून तिनं या मुलीला महाराजांच्या भेटीला पाठवलं आहे.

**महाराज** : मोहनदास परेखचा वाडा कधीही लुटला जाणार नाही. मराठा मरेल, पण दिलेला शब्द कधीही मोडणार नाही. नेताजी, विधवा आईचं मन आम्ही जाणतो. विधवा आईला संपत्तीची चिंता नसते. तिला चिंता असते तिच्या संतानांची ! नेताजी, विधवा आईच्या मनाची वेदना तुम्हाला कधी जाणवली आहे ?

**नेताजी** : महाराज, नकळत कसूर घडली. माफी असावी.

**महाराज** : नेताजी, सुरतेतल्या लुटीपेक्षा आज काहीतरी अधिक मोलाचं आम्ही मिळवलं आहे. आणि ते म्हणजे एका विधवा आईचा विश्वास ! शहरात पेटलेल्या वणव्यातून तिनं आपली तरणीताठी मुलगी आमच्या भेटीला पाठवली. मराठ्यांच्या सद्‌गुणांची ही पोचपावती आहे. नेताजी, आता वेळ गमावू नका. या मुलीला साडीचोळी अलंकार भेट द्या. (नेताजी

तशी व्यवस्था करतो.) तिला म्हणावं– तुझ्या मातोश्रीला सांग, मराठे सैनिक स्त्रियांचा आदर करतात. आणि हेही सांग, मोहनदास परेखांची पुण्याई आलमगिराच्या मोगलाईपेक्षा आम्हाला थोर वाटते! आमचे सैनिक तिला सुरक्षित पोचवतील. नेताजी, निघण्याची सिद्धता करा.

नेताजी : जशी महाराजांची आज्ञा!

(नेताजी मावळ्यांना खुणावतो. पडद्यात शिंग वाजू लागते. मावळे येऊ लागतात. घोड्यांच्या टापा वाजू लागतात. पडदा पडतो.)

❋ ❋ ❋

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १८५८६० नों. वि. १५-१२-१०४
वि. बा वा

IRBK-0115565

